पुण्य नगरी

# किसान महाविद्यालयात सायबर दक्षता अन् संरक्षण जागृती उपक्रम

**पारोळा :** येथील किसान महाविद्यालयात २३ जुलैला राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास आणि करीयर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर संरक्षणाबाबत जणजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. वाय. व्ही. पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सविता चौधरी, डॉ. किरण पाटील तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यापीठातील तृतीय वर्ष संगणक विज्ञान विभागातील स्वंयसेविका विद्यार्थिनी विशाखा शिंदे आणि श्रद्धा अहिरराव उपस्थित होत्या. प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. काकासाहेब गायकवाड यांनी केले. विशाखा शिंदे आणि श्रद्धा अहिरराव यांनी तांत्रिक जगतात वावरतांना मोबाईल, संगणक वा सोशल मीडिया संबंधित विविध ॲप हाताळतांना घ्यावयाची दक्षता, सुरक्षितता, मोबाईल



अतिवापराचे तोटे, चित्रिकरण, सेल्फी गुन्हा, व्हिडिओ कॉल गुन्हा यासंदर्भात माहिती दिली. अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. वाय. व्ही. पाटील यांनी सायबर संरक्षण ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

तांत्रिक सहाय्यक म्हणून प्रा. ईशांत भालेराव, सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र भावसार यांनी, तर आभार डॉ. शशिकांत पाटील यांनी मानले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

Jalgaon Edition
Jul 24, 2025 Page No. 09
Powered by: erelego.com